दिनांक :- २०/११/२०२६

परीक्षा अर्ज भरण्याबाबत सूचना

नियमित विद्यार्थी – तीन वर्षांचा विधी अभ्यासक्रम (Three-Year Law Course) व पाच वर्षांचा विधी अभ्यासक्रम (Five-Year Law Course)

तीन वर्षांचा विधी अभ्यासक्रम व पाच वर्षांचा विधी अभ्यासक्रमातील नियमित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की मुंबई विद्यापीठाच्या दिनांक **१६/१०/२०२६** रोजीच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयाने दिनांक **१९/१०/२०२६** रोजी प्रसिद्ध केलेल्या सूचनेनुसार दुष्काळग्रस्त क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी Google Form भरून सादर केला आहे, अशा पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरण्यातून सूट कायम राहील.

महिला उमेदवार व इतर पात्र प्रवर्गातील विद्यार्थी

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग रोजीच्या शासन निर्णय दिनांक ०८ जुलै २०२४ नुसार **SEBC, EWS व OBC प्रवर्गातील महिला उमेदवार तसेच अनाथ (Orphan) उमेदवार** यांना परीक्षा शुल्कातून सूट देण्यात आलेली आहे.

वरील प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयाच्या पोर्टलवर परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय उपलब्ध असल्यास किंवा परीक्षा शुल्काची रक्कम दर्शविली जात असल्यास, अशा विद्यार्थ्यांनी **परीक्षा शुल्क भरू नये व तात्काळ महाविद्यालयाच्या कार्यालयास कळवावे**, जेणेकरून आवश्यक पडताळणी करून योग्य ती कार्यवाही करता येईल.

१. महत्त्वाच्या तारखा

तपशील	अर्ज भरण्याची अंतिम तारीख
III SEM – III & IV, V SEM – III & IV आणि V SEM – VII & VIII	२४/११/२०२६
इतर सर्व सत्रे	३०/११/२०२६

परीक्षा शुल्क भरण्याचे पर्याय

अ. विद्यार्थ्यांच्या लॉगिनमधील ऑनलाइन पेमेंट पर्याय :

ज्या विद्यार्थ्यांना आपल्या लॉगिनमध्ये उपलब्ध असलेल्या ऑनलाइन पेमेंट सुविधेद्वारे (Payment gateway) परीक्षा शुल्क भरावयाचे असल्यास त्यांना निर्धारित परीक्षा शुल्काव्यतिरिक्त संबंधित पेमेंट प्लॅटफॉर्मचे लागू असलेले अतिरिक्त शुल्क (Platform Charges) विद्यार्थ्यांना भरावे लागेल.

ज्या विद्यार्थ्यांना निर्धारित परीक्षा शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त शुल्क (Platform Charges) भरावयाचे नसल्यास त्यांनी खालील नमूद केलेल्या पर्यायांचा वापर करावा परंतु अश्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी भरल्यानंतर महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेला गुगल फॉर्म भरणे बंधनकारक राहील.

१. **SBI Collect द्वारे पेमेंट:**

विद्यार्थी SBI Collect या सुविधेद्वारे परीक्षा शुल्क भरू शकतात.

२. **ऑफलाइन पेमेंट :**

विद्यार्थी महाविद्यालयात प्रत्यक्षरित्या येऊन दिनांक २३/११/२०२६ ते ३०/११/२०२६ (सोमवार ते शुक्रवार मध्ये) सकाळी ११:०० ते दुपारी ०१:०० या वेळेत परीक्षा शुल्क ऑफलाइन पद्धतीने भरू शकतात.

परीक्षा अर्ज भरणे, परीक्षा शुल्क भरण्याचे पर्याय किंवा परीक्षा शुल्कातून सूट यासंबंधी कोणतीही शंका अथवा अडचण असल्यास विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

AAvaidya

डॉ. अमिता वैद्य
प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'ए'मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०